**महाराष्ट्र शासन**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार,
नवीन गोकुळदास तेजपाल संकुल, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१

क्र. बैठक-१०२४/प्र.क्र.२७४/२४/शिक्षण-२ दिनांक: १३/०९/२०२४

प्रति,
सचिव,
शुल्क नियामक प्राधिकरण,
खोली क्र. ३०५, तिसरा मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

विषय:- राज्यातील खाजगी विनाअनुदानित आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील संस्थात्मक कोट्याच्या (Institutional Quota, NRI सहीत) शुल्क निश्चितीबाबत.

संदर्भ:- १) असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ आयुर्वेदिक मेडीकल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र यांचे पत्र क्र. AMAMCM/४१/२०२४, दिनांक १०/०९/२०२४.
२) शासनपत्र क्र. बैठक-१०२४/प्र.क्र.२७४/२४/शिक्षण-२, दिनांक २६/०७/२०२४.

महोदय,

वरील विषयाबाबत मा. मंत्री (वै.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०७/२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त आपणांस संदर्भाधीन क्र.२ वरील पत्राव्दारे पाठविण्यात आले आहे. यानुषंगाने असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ आयुर्वेदिक मेडीकल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र यांचेव्दारे संदर्भाधीन दिनांक १०/०९/२०२४ रोजीच्या निवेदनास अनुसरुन मला प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार आपणांस पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे:-

मा.मंत्री (वै.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०७/२०२४ रोजी आयोजित बैठकीमध्ये राज्यातील खाजगी विनाअनुदानित आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी पदवी/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात संस्थात्मक कोट्यातून (Institutional Quota, NRI सहीत) प्रवेश घेणा-या उमेदवारांकडून चालू शैक्षणिक वर्षापासून (सन २०२४-२५) नियमित शैक्षणिक शुल्काच्या ०५ पट शैक्षणिक शुल्क आकारण्यास हरकत नसल्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यानुषंगाने सदर महाविद्यालयांतील शुल्क निश्चितीबाबत महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदीस अनुसरुन शुल्क नियामक प्राधिकरणाने नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, ही विनंती.

13.09.2024
(नि.ब.महाडीक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी
१. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई.
२. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. निवडनस्ती (शिक्षण-२)